कायम विना अनुदान तत्वावर (इंग्रजी माध्यम)

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./ /३१४
/खा.प्रा.शा./ / दि. १/१०/०७

प्रति :-
~~मुख्याध्यापक~~/मुख्याध्यापिका
उत्कर्ष इं.मे. प्रायमरी स्कूल
सोलापूर बजार कॅम्प पुणे-१

विषय :- कायम -विना - अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खासगी प्राथमिक शाळांना ~~जादा~~/ नैसर्गिक वाढीचा / ~~वाढीच्या प्रथम~~/ जादा तुकडया/ वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत......

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक -व्ही. एल. एस. १००२/ (१०००/०२) प्रा. शि. -३. दिनांक १४ जाने. २००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमुद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/ नैसर्गिक वाढीचा/ वाढीच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जुन २००७पासून सन २००७ - २००८च्या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/ नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | उत्कर्ष इं.मे. प्रा. स्कूल २७८, सोलापूर बजार पुणे-१ | इंग्रजी | सहावी | दुसरी | नैसर्गिक वाढीने |

अटी व शर्ती

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक संख्येने कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.

२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतीक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजे.

३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.

४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची.आंमलबजावणी केली पाहिजे.

५. सदर मंजुर करण्यात येणा-या तुकडीमध्ये परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

६. सदर शाळेच्या वर्गास/ तुकडीस विद्यार्थीसंख्या पूरेशी असणे आवश्यक आहे.

७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाहय निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.

८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

९. शासन निर्णय दि. ५/२/२००० नुसार विद्यार्थ्यांच्या मातेचे नाव जनरल रजिस्टर व शाळा सोडण्याच्या प्रमाणपत्रावर लिहणे बंधनकारक आहे.

१०. याचिका क्र. -४१५९/१९९८ मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्राथ. शिक्षकासाठी डी. एड. हीच प्रशिक्षित अर्हता योग्य आहे.यामुळे प्राथमिक शिक्षकपदी एच. एस. सी. डी. एड. अर्हतेचेच शिक्षक नियमानुसार नियुक्त करुन या कार्यालयाकडून त्यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे.

शिक्षणाधिकारी,(प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद, पुणे करिता

प्रत : माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

सचिव / अध्यक्ष

कॅम्प एज्यु. सोसायटी, डॉ. आझम कॅम्पस, आझम मोहम्मद स्ट्रीट पुणे-१